# बांधकाम विभाग,जिल्हा परिषद ., कोल्हापूर

e-mail - eeworkkop@gmail.com

जा.क्र./बांखा/रेशा/वशि/९५५/२०२१ दिनांक :- ९/१९/२०२१

प्रति,
व्यवस्थापक
टेलिसोनिक नेटवर्क लि.
मुंबई-६४

**विषय :- जिल्हा परिषद अखत्यारितील रस्त्यांच्या हद्दीमधून रस्त्याच्या कडेने ऑप्टीकल फायबर केबल टाकणेस परवानगी मिळणे बाबत.**

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र दि. ८/९/२०२०
२)उप अभियंता जि.प. उप विभाग कागल यांचेकडील जाक्र. उविका/बांध/ वशि/११५ /२०२० दि. ८/१२/२०२०
३) आपलेकडील डी.डी. दि. २०/८/२०२१
४) आपलेकडील बँक गॅरंटी व करारपत्र दि. १७/८/२०२१
५) शासन निर्णय क्र. जमीन १०/२०००/प्र.क्र.९१-ज१ दि.२७/४/२०००

आपले संदर्भीय पत्र क्र १ अन्वये जि.प अखत्यारीतील खालील रस्त्याच्या कडेने ऑप्टिकल फायबर केबल टाकणेचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला होता.

१) रा.मा. १७८ ते उंदरवाडी ते हरिजनवस्ती ते बेलजाई देवालय रस्ता ग्रामा क्र. २९ कि.मी. ०/० ते १/२०० एकूण लांबी १२०० मी.

सदर प्रस्ताव उप अभियंता जि.प.उप विभाग कागल यांचेकडे संयुक्त पाहणी करणेकरीता पाठविणेत आला होता. त्याअनुषंगाने उप अभियंता (बांधकाम) जि.प. उप विभाग कागल यांनी संदर्भ क्र. २ नुसार त्या बाबतचे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केले होते. त्यास अनुसरून सदर रस्त्याच्या बाजूने जमिनीखालून ऑप्टिकल फायबर केबल टाकावयाची असलेने जमीन व रस्ते पुर्ववत करणेसाठी रू.९५,०००/- (रिस्टोरेशन चार्जेस) डी.डी. संदर्भ क्र. ३ अन्वये व बँक गॅरंटी व करारपत्र संदर्भ क्र ४ च्या पत्रान्वने आपलेकडून जमा करणेत आले आहे.

त्याअनुषंगाने आपले कंपनीस खालील अटीस अधिन राहून सदर ऑप्टिकल फायबर केबल टाकणेसाठी परवानगी देणेत येत आहे.

अटी व शर्ति :-

१) सदर ऑप्टिकल फायबर केबल रस्त्याच्या पृष्ठभागाच्या सर्वसाधारणपणे ८ मी. ते कमीतकमी १.५० मी खोली असावी. (तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार उंची वाढु शकेल) रस्त्याच्या क्रॉसिगच्या लांबीसाठी मुळ ऑप्टिकल फायबर केबल केसिंग पाईपचा वापर करावा. सदर केसिंग पाईप आर.सी.सी. किंवा स्टिलची असावी.

२) परवानगी प्राप्त झालेनंतर कंपनीने ऑप्टिकल फायबर केबल टाकताना संपूर्ण दक्षता घ्यावी व वाहतुकीस अडथळा / गैरसोय होणार नाही आणि अपघात झालेस त्याची संपूर्ण कायदेशीर व त्याअनुषंगाने नुकसान भरपाईची जबाबदारी आपणावर राहील.

३) ऑप्टिकल फायबर केबल टाकनेचे काम व रस्ता खोदुन पुर्ववत करणेचे काम संबधीत उप अभियंता जि.प. उप विभाग यांचे देखरेखीखाली करणेत यावे.

४) रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये आपण जर रस्त्याच्या बाजुस टाकलेली ऑप्टिकल फायबर केबल येणार असेल तर सदरची केबल आपले कंपनीस स्वतःचे खर्चाने काढुन रस्ता हद्दीचे बाहेर टाकुन घ्यावी लागेल.

५) आकस्मित परिस्थितीमध्ये ऑप्टिकल फायबर केबल टाकणेचे काम थांबविणेचे हक्क राखुन ठेवले आहेत.

६) भविष्य काळात सदर ऑप्टिकल फायबर केबल खराब होऊन नागरी वसाहतीस धोका उत्पन्न झाला तर त्याची कायदेशीर नुकसान भरपाईची जबाबदारी कंपनीवर राहील.

७) सदर कामासाठी भरावे लागणारे शासकिय कराची रक्कम जीएसटी व इतर कर भरणेची जबाबदारी कंपनीची राहील.

८) ऑप्टिकल फायबर केबल रस्त्याच्या मध्यापासून किती अंतरावर टाकणेत आली त्याचे रेखांकन करून नकाशा सादर करणेत यावा.

वरील अटी व शर्तिंचे उल्लंघन झालेस सदर कामासाठी भरणेत आलेले कोणतेही शुल्क परत न देता ऑप्टिकल फायबर केबल टाकणेस देणेत आलेली परवानगी रद्द करणेत येईल.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

प्रत:-

उप अभियंता (बांधकाम) जि.प. उप विभाग कागल यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
२/ केबल टाकणेचे काम सुरू असताना आपण व्यक्तीशः उपस्थित राहून कामाची पाहणी करावी व कंपनीकडून रस्ते तात्काळ पुर्ववत करून घेणेत यावेत.